
दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/74482 • शनिवार दि.११ एप्रिल २०२६ • अंक-८७ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.




# इतिहास घडविणाऱ्या खेळाडूंच्या आठवणी जपण्याचा उपक्रम अभिनव-मुख्यमंत्री फडणवीस

## वानखेडे स्टेडियमवरील स्टँड व गेटच्या नामकरण सोहळ्यात क्रिकेट दिग्गजांचा मुख्यमंत्र्यांकडून गौरव

**मुंबई । प्रतिनिधी**

या खेळाडूंनी इतिहास घडवला, त्यांच्या आठवणी कायम जिवंत ठेवण्यासाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनने आपल्या आयकॉनिक खेळाडूंच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी घेतलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे.वानखेडे स्टेडियमसारख्या ऐतिहासिक ठिकाणीच अशा प्रकारचा सन्मान सर्वोत्तम पद्धतीने होऊ शकतो, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वानखेडे स्टेडियमवर एकनाथ सोलकर गेट, डायना एडुलजी गेट आणि दिलीप सरदेसाई गेट असे नामकरण तर रवी शास्त्री स्टँडचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार, क्रिकेटपटू सुनील गावसकर, दिलीप वेंगसरकर, रवी शास्त्री, डायना एडुलजी, सूर्यकुमार यादव तसेच मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक, उपाध्यक जितेंद्र आव्हाड, उन्मेष खानविलकर, अरमान मलिक, अभिनेता जॅकी श्रॉफ आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुनील गावस्कर, दिलीप वेंगसरकर, एकनाथ सोलकर, दिलीप सरदेसाई, डायना एडुलजी आणि रवी शास्त्री यांसारख्या दिग्गजांच्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. सुनील गावस्कर यांनी हेल्मेटशिवाय वेगवान गोलंदाजांचा निर्भीडपणे सामना करत भारतीय क्रिकेटला नवी दिशा दिली. दिलीप वेंगसरकर यांनी कठीण प्रसंगी संघ सावरण्याची भूमिका निभावली,असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.एकनाथ




सोलकर यांच्या अफाट क्षेत्ररक्षण कौशल्याचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळातही त्यांची फील्डिंग अद्वितीय ठरली असती. तसेच दिलीप सरदेसाई यांच्या परदेशातील कामगिरीमुळे भारतीय क्रिकेटला नवे स्थान मिळाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

महिला क्रिकेटच्या क्षेत्रात डायना एडुलजी यांच्या योगदानाची दखल घेत, त्यांनी महिलांच्या क्रिकेटमध्ये झालेल्या प्रगतीचे कौतुक केले. तसेच रवी शास्त्री यांच्या अष्टपैलू कामगिरीचा उल्लेख करत त्यांच्या खेळाडू, प्रशिक्षक आणि समालोचक म्हणूनच्या भूमिकेचेही त्यांनी कौतुक केले.आधुनिक क्रिकेटमधील स्टार खेळाडू सूर्यकुमार यादव यांच्या अभिनव फलंदाजी शैलीचे विशेष कौतुक करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ३६० डिग्री खेळ करणारे सूर्यकुमार यादव हे मुंबईच्या क्रिकेट संस्कृतीचे उत्तम उदाहरण आहेत. त्यांच्या कामगिरीमुळे मुंबईचा गौरव वाढला आहे.

मुंबईतील क्रिकेट पायाभूत सुविधांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, शहरातील छोट्या मैदानांचे संवर्धन आणि जुन्या लीजसंदर्भातील प्रश्न सोडविण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. वीस-वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्नही आम्ही सोडवू, असे ते म्हणाले.मुंबईत अत्याधुनिक आणि मोठ्या स्टेडियमच्या उभारणीसाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. ही अंदाजे ६० ते ८० हजार प्रेक्षक क्षमतेचे हे स्टेडियम असेल. उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी आणि कोणत्याही जागेवरून उत्तम दृश्य मिळेल, अशा पद्धतीने ते उभारले जाईल,असे त्यांनी सांगितले.तथापि, कितीही नवी स्टेडियम्स उभारली, तरी वानखेडे स्टेडियमचे महत्त्व कायम राहील. वानखेडे हे सदैव आयकॉनिकच राहील, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनला सर्वतोपरी पाठबळ देण्याची ग्वाही दिली.मुंबई क्रिकेटच्या वैभवशाली परंपरेचा गौरव करणारा आजचा दिवस सुवर्णक्षण ठरला असून, या माध्यमातून महान खेळाडूंना योग्य सन्मान देण्याचे कार्य पार पडले, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ड. आशिष शेलार यांनी केले.सांस्कृतिक कार्य मंत्री ड.शेलार म्हणाले की, मुंबई क्रिकेटने जगाला उत्कृष्ट खेळाडू दिले असून त्यांच्या कार्याचा गौरव करण्याची ही योग्य वेळ आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून क्रिकेट क्षेत्रातील दिग्गजांच्या योगदानाची नोंद इतिहासात कोरली जात असून हा क्षण अभिमानास्पद आहे.महिला क्रिकेटला उंचीवर नेण्यात डायना एडुलजी यांचे योगदान उल्लेखनीय असून त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही देशाचे नाव उज्ज्वल केले. तसेच दिलीप सरदेसाई यांना 'जनरेशन टुगेदर' क्रिकेट लिजेंड संबोधत त्यांच्या खेळाची आठवण त्यांनी यावेळी करून दिली. एकनाथ सोलकर यांच्या चपळ क्षेत्ररक्षणाचे उदाहरण देत शेलार यांनी त्यांच्या प्रामाणिक आणि प्रेरणादायी आयुष्याचा गौरव केला. तसेच रवी शास्त्री यांना चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स म्हणत त्यांच्या नावाने स्टँडला नामकरण करणे उचितच असल्याचे त्यांनी नमूद केले.मुंबईच्या खेळाडूंनी वानखेडे मैदानावर अनेक विक्रम प्रस्थापित करत जागतिक क्रिकेटला दिशा दिली आहे. सुनील गावस्कर, दिलीप वेंगसरकर आणि रवी शास्त्री यांच्या भागीदारी आजही प्रेरणादायी असून त्यांचे विक्रम अजूनही अबाधित आहेत, असेही मंत्री ड.शेलार यांनी सांगितले.

# भैरवनाथ केसरीचे मानकरी सुस येथिल जयदीप पवार

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुणे येथिल सुस गावचे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ यांचा उत्सव दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अत्यंत आनंदाने साजरा करण्यात आला या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे करण्यात आले होते या कार्यक्रमाला सुस गावातील अनेक नागरिक उपस्थित होते याच प्रमाने अनेक मान्यवरांची उपस्थित या ठिकाणी दिसून येत होती

बुधवारी दिनांक ८ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजता श्री काळभैरवनाथ यांचा अभिषेक करण्यात आला याच प्रमाणे सायंकाळी ७ वाजता काळभैरवनाथ पालखीची मिरवणूकचां सोहळा संपन्न झाला रात्री दहा वाजता किरण ढवळपूरीकर यांचे लोकनाट्याचा सांस्कृतीक कार्यक्रम पार पडला गुरूवारी ९ एप्रिल सकाळी वगनाट्य संपन्न झाला याचं प्रमाणे सकाळी भव्य राज्यस्तरिय कुस्तीचे उद्घाटन स्थायी समितीचे माजी अध्यक्ष आणि पुणे महापालिकेचे नगरसेवक बाबूराव चांदेरे यांच्या शूभ हस्ते संपन्न झाला या कुस्ती स्पर्धेत एकूण २५० मल्लांनी सहभाग नोंदवीला यामध्ये तालूका स्थरिय ,जिल्हा स्थरिय ,, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अशा गटातील स्पर्धेत सहभागी



झाले होते याच प्रमाणे या कुस्ती स्पर्धेत महिलांनी देखील सहभाग घेतला होता महिलांनी देखील प्रेक्षणीय ६ कुस्त्या खेळल्या या मध्ये १२ महिलांनी सहभाग घेतल्याचे दिसून आले अटीतटीच्या सामन्या मध्ये भैरवनाथ केसरीचे मानकरी सुस गावचे जयदीप पाटील ठरले या बक्षीस समारंभात स्थायी समितीचे याची अध्यक्ष नगरसेवक बाबुराव चांदेरे ,नगरसेवक अमोल बालवडकर ,शिवाजी काळे यांनी भैरवनाथ केसरीचे मानकरी ठरलेले जयदीप पाटील यांना कै मुरलीधर चांदेरे यांच्या स्मरणार्थ निलेश चांदेरे ,साघव चांदेरे यांच्या हस्ते चांदीची गदा देण्यात आली यात उपविजेता सोलापूरचे रोहन पवार ठरले सुस येथिल भैरवनाथाचा कार्यक्रम अतिशय सूंदरमय वातावरणात संपन्न झाला या कार्यक्रमाला सुस,बाणेर, बालेवाडी,म्हाळूंगे येथिल ग्रामस्थांनी या उत्सवाच्या निमित्ताने एकत्र येऊन उत्सव पार पाडला.

# मराठवाडा हादरला! हिंगोलीत ४.७ रिश्टरचा भूकंप

**हिंगोली (वृत्तसंस्था)**

मराठवाडा परिसरात पुन्हा एकदा भूकंपाचे धक्के जाणवले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आज सकाळी ८ वाजून ४७ मिनिटांनी हिंगोली जिल्ह्यात भूकंप झाला. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.७ इतकी नोंदवली गेली आहे. अचानक बसलेल्या या धक्क्यामुळे नागरिक काही काळ घराबाहेर पडल्याचे चित्र पाहायला मिळाले.

भूकंप हिंगोली जिल्ह्यातील औंढानागनाथ परिसरात झाल्याची माहिती सर्वप्रथम समोर आली. मात्र, वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे गावाजवळ भूकंपाचे मुख्य केंद्र असल्याचे प्राथमिक निष्कर्षातून स्पष्ट झाले आहे. या भागात




काही सेकंद जमीन हलल्याची जाणीव नागरिकांना झाली.या भूकंपाची नोंद लातूर येथील भूकंप मापन केंद्रावर करण्यात आली आहे. मराठवाड्यातील भूकंपीय हालचालींवर लक्ष ठेवणाऱ्या यंत्रणांनी तात्काळ या घटनेची माहिती संकलित केली. अधिकृत आकडेवारी नुसार, भूकंपाची तीव्रता मध्यम स्वरूपाची असली तरी काही ठिकाणी कंप स्पष्टपणे जाणवले.हिंगोलीसह नांदेड आणि परभणी जिल्ह्यांमध्येही या भूकंपाचे धक्के जाणवले. अनेक नागरिकांनी घरातील वस्तू हलल्याचे सांगितले. काही ठिकाणी लोक घाबरून घराबाहेर धावले, मात्र सुदैवाने आतापर्यंत कोणतीही मोठी जीवित किंवा वित्तहानी झाल्याची माहिती नाही.

# कायद्याचे रक्षण करणारे एक नंबर चोर

**पुणे । रमेश जयस्वाल**

बंडगार्डन पोलिस ठाण्यातील प्रकार / प्राचार्यांवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून बदनामीची धमकी / शहरातील पोलिस दलातील रिडल्स स्टार महिला अंमलदार, एक पोलिस अधिकारी यासह एकूण तीन पोलिसांवर खंडणीचा गुन्हा

पुणे शहरातील अनेक पोलिस ठाण्यात अंतर्गत पोलिसांचे अवैध प्रकाराला लागायचं लागत नाही अधिका-यांना हाताशी धरून अंमलदार एका नामांकित महाविद्यालयाच्या प्राचार्या कडून सात लाखांची खंडणी उकळतात हा धक्कादायक प्रकार म्हणजे पोलिस दलाला काळीमा फासण्याचा प्रकार आहे संबंधीत प्राचार्यावर त्यांच्याच महाविद्यालयातील अल्पवयीन मुलीला हाताशी धरून पोस्को नुसार गुन्हा दाखल करण्याची धमकी देत या गुन्ह्यात अटक व संस्थेची बदनामी




करण्याची भिती दाखवत खंडणी उकळण्याचा प्रकार पुढे येत आहे मुलगी अल्पवयीन आहे आणि आपल्या संस्थेची बदनामी होईल म्हणून प्रकरण येथेच थांबवण्याचे असेल तर दहा लाख रूपये द्यावे लागतील शेवटी बदनामी आणि अटकेच्या भितीने यांना सात लाख रूपये देण्यास भाग पाडणारे महिला सुरक्षा पथकातील तील स्टार सोनाली हिंगे ,पोलिस उपनिरिक्षक अजित बंडे,पोलिस कर्मचारी सुदामा तायडे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे शहरात असे अनेक प्रकार उघड होत आहे मग एक प्रश्न उपस्थित होतो त्या त्या ठिकाणचे ठाणेदार काय करतात यांची वचक संबंधीत ठाण्यातील कर्मचा-यावर का नाही कोठे तरी पाणी मूर्त आहे पुण्यातील हा प्रकार केवळ एका प्राचार्या वरील अन्याय नाही तर संपूर्ण न्यायव्यवस्थेला हादरा देण्याचा प्रकार आहे शहरातील पोलिस ठाण्याचे कर्मचारी पॉस्कोचा संवेदनशील कायद्याचा वापर संरक्षणासाठी नव्हे तर खंडणी साठी वापर होत आहे या मुलीने पोलिस आयूक्त अमितेश कूमार यांची भेट घेऊन घडलेला प्रकाराची माहिती दिली या नंतर प्राथमिक चौकशी करण्यात आली या नंतर हा प्रकार पूढे आलेला आहे या कटातील सर्वात धक्कादायक रील स्टार आणि महिला पोलिस असलेली सोनाली हिंगे हिची भुमिका सोशल मिडिया वर पोलिस वर्दीत रील्स बनवत लोकप्रिय होत स्वतः ची इमेज बनवत जनतेला फसवत खंडणी मागणे अनेकांना विश्वासात घेऊन एकी कडे महिला सुरक्षेचे संदेश देणे आणि दुसरी कडे अनेक गुन्ह्यात सहभागी होणे शहरातील सर्वंच पोलिस ठाण्यात असे महाभाग कार्यरत आहे यावर पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी राजकिय दबाव ,प्रतिष्ठा आणि अंतर्गत यंत्रणेचे रक्षण याला तसेच कोणत्याही गोष्टीला बळी न पडता यांनी सर्व ठिकाणच्या बाबी लक्षात घेता सत्य बाहेर आणत त्या त्या पोलिस ठाण्यात असला प्रकार घडत असेल तर त्या पोलिस ठाण्यातिल वरिष्ठ पोलिस निरिक्षकांनाही दोषी धरत यांच्यावरही कारवाई करावी.

## जय महाराष्ट्र नगर वसंत व्याख्यानमालेचे पुरस्कार जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

जय महाराष्ट्र नगर बोरीवली पूर्व येथील जय महाराष्ट्र नगर वसंत व्याख्यानमालेचे पुरस्कार जाहीर करण्यात आले असून भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी खासदार श्री. गोपाळ शेट्टी यांनी पुरस्कृत केलेल्या विजय वैद्य उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराची तसेच जय महाराष्ट्र नगर वसंत व्याख्यानमालेच्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. विजय वैद्य यांच्या नावाचा पहिला उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार ज्येष्ठ नाट्य समीक्षक आणि शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांच्या दैनिक सामना मध्ये प्रारंभापासून सुमारे तीस वर्षे उच्च पदावर निष्ठापूर्वक जबाबदारी पार पाडणारे ज्येष्ठ पत्रकार श्री संजय



डहाळे यांना देण्यात येणार आहे. जय महाराष्ट्र नगर वसंत व्याख्यानमालेचा शारदा पुरस्कार ज्येष्ठ चित्रपट समीक्षक म्हणून लोकप्रियता मिळविलेले श्री दिलीप ठाकूर यांना, प्रेरणा पुरस्कार वायंगणकर साई स्पोर्ट्स च्या आधारस्तंभ सौ. पल्लवी राकेश वायंगणकर यांना तसेच जय महाराष्ट्र नगर भूषण पुरस्कार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री विजय पडकील यांना देण्यात येणार आहे. जय महाराष्ट्र नगर वसंत व्याख्यानमाला येत्या २४, २५ आणि २६ एप्रिल २०२६ असे तीन दिवस आयोजित करण्यात आली असून या वसंत व्याख्यानमालेच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते हे पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार असल्याचे संयोजकांनी सांगितले. एकता विनायक चौक, जय महाराष्ट्र नगर, बोरीवली पूर्व येथे रोज सायंकाळी साडेसात वाजता ही व्याख्यानमाला होणार आहे. रसिक श्रोत्यांनी या बौद्धिक मेजवानीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही संयोजकांनी केले आहे.

## ठाणे महानगरपालिकेच्या पावसाळा पूर्व नालेसफाईस मुंब्रा येथून प्रारंभ

**संतोष पडवळ । ठाणे**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिका हद्दीतील नालेसफाईच्या कामाचा शुभारंभ आज मुंब्रा परिसरातून करण्यात आला. मुंब्र्यातील अमृतनगर नाला येथे महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या शुभहस्ते विरोधी पक्ष नेते अशरफ ऊ. शानू पठाण यांच्या उपस्थितीत नालेसफाईच्या कामास सुरूवात करण्यात आली. आज मुंब्रा येथून नालेसफाईस सुरूवात झाली असून संपूर्ण शहरातील नाले सफाईची कामे मे महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण होतील या दृष्टीने प्रशासनाने नियोजन करण्याच्या सूचना महापौरांनी यावेळी दिल्या.

मुंब्रा प्रभाग क्र. ३२ मधील अमृत नगर येथील नाल्यापासून नालेसफाईला प्रारंभ करण्यात आला. यावेळी स्थानिक नगरसेविका मरझिया पठाण तसेच परिसरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. दरवर्षी नालेसफाईला उशीरा सुरूवात होते. मात्र यावर्षी एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यातच नालेसफाईस सुरूवात करण्यात आली आहे,



लवकरच ठाणे शहरातील सर्व नाल्याच्या सफाईला देखील सुरूवात होणार आहे. नालेसफाईनंतर नाल्यातील काढलेला गाळ हा रस्त्याच्या कडेला न ठेवता तो तात्काळ उचलला जाईल याची देखील दक्षता घेण्याच्या सूचना महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी संबंधित विभागाला दिल्या. तसेच प्रत्येक प्रभागात स्वच्छता निरीक्षक, उपमुख्यस्वच्छता निरीक्षक यांनी नालेसफाईच्या कामावर लक्ष ठेवावे. तसेच उघड्या असलेल्या नाल्यांमध्ये नागरिकांनी देखील कचरा टाकू नये असे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी यावेळी केले.

## ZEE5 तर्फे 'एव्हरीबडी लव्हज् सोहराब हांडा' या नवीन चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित

**ठाणे-ZEE5** ने मिथ्या टॉकीजच्या सहकार्याने अप्लॉज एंटरटेनमेंट निर्मित आगामी 'एव्हरीबडी लव्हज् सोहराब हांडा' या स्टायलिश मर्डर मिस्ट्री चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित केला. प्रसिद्ध चित्रपट निर्माते आणि अभिनेते रजत कपूर लिखित आणि दिग्दर्शित हा डायरेक्ट-टू-डिजिटल चित्रपट १० एप्रिलपासून केवळ हिंदी ZEE5 वर प्रदर्शित होणार आहे. विनय पाठक, रणवीर शौरी, वालुशा डी सोसा, सौरभ शुक्ला, नील भूपालम, कोयल पुरी, चंद्रचूर राय, पलोमी घोष आणि रजत कपूर या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या आणि शक्तिशाली कलाकारांच्या




जबरदस्त टीमसह हा चित्रपट एका विशिष्ट समकालीन, गडद विनोदी दृष्टिकोनातून एक उत्कृष्ट चित्रपट आहे.कथेच्या केंद्रस्थानी सोहराब हांडा (विनय पाठकने साकारलेली भूमिका) एक कडवट बोली, अर्वाच्य भाषा वापरणारा टग्या आहे. ज्याची भ्रष्ट बुद्धी आणि बिनशर्त अहंकाराने त्याचे अस्तित्व चार-चौघात अधोरेखित होते. तो प्रामाणिक असल्याने त्याच्याकडे दुर्लक्ष होते, मूर्खपणाचा तिरस्कार करणारा सोहराब सभ्यतेचा अभिमान बाळगणाऱ्या गर्दीत कोणालाही सोडत नाही. मित्र आणि कुटुंबियांमधील एका जिव्हाळ्याच्या कार्यक्रमादरम्यान, सहजपणे विनोद म्हणून कथा सुरू होते. मुक्तपणे फेसळणारी पार्टी आणि रंगणारा खेळ लवकरच अस्वस्थता धारण करतात. रात्री उशिरा सोहराबची निर्घृणपणे हत्या झाल्याचे आढळून येते, तेव्हा संशयाचा मार्ग मोकळा करून, संताप आणि नैतिक अस्वस्थता बाहेर येते, आनंदी वातावरणाचा भंग होतो. तपास पुढे सरकतो, तसतसे हे स्पष्ट होते की प्रत्येकजण सोहराब हांडावर प्रेम करत असल्याचे नाटक करतो आहे. अनेकांकडे त्याला कायमचे गप्प करण्याची कारणे होती. धारदार संवाद, कंगोरे असलेला अभिनय आणि कधीही उघड न झालेल्या सत्यामुळे वातावरण तापते. एव्हरीबडी लव्हज् सोहराब हांडातील खून गूढ शैलीत एक ताजातवाना, तल्लख विषय आहे. हा चित्रपट प्रेक्षकांना केवळ गुन्हेगारीचे निराकरण करण्यासाठी नव्हे तर नातेसंबंध, छुपी सत्ये, मैत्री आणि गुप्त हेतूंबद्दलच्या अस्वस्थ सत्यांचा सामना करण्यासाठी आमंत्रित करतो.लेखक-दिग्दर्शक रजत कपूर म्हणाले, मला शैलीदार चित्रपटांमध्ये खूप रस आहे-आणि त्या सर्व गोष्टी मला हाताळायच्या आहेत. मी 'हूडनिट' म्हणजेच रहस्य कथेकडे आकर्षित झालो. मला निव्वळ भावनिक हिंसेत रस नव्हता, तर ती शारीरिक हिंसाचारापूर्वीची भावनिक हिंसा होती. आणि अनेक प्रकारे, हे 'हूडनिट'च्या पलीकडे जाते. हे असे लोक आहेत जे एकमेकांकडे पाहून हसतात, एकत्र मद्यपान करतात, एकत्र जल्लोष करतात. पण असे बरेच काही आहे जे उघडपणे बोलले जात नाही. अव्यक्त मौन अनपेक्षित गोष्टीला जबाबदार ठरते. त्यानंतर आम्ही कलाकारांचा एक उत्कृष्ट समूह एकत्र आणण्याच्या दृष्टीने काम केले. प्रत्येक फ्रेममध्ये १५ हून अधिक अद्भुत कलाकारांसह चित्रपटाचे चित्रीकरण करणे फारच आनंददायक आहे. विनय पाठक म्हणाला , सोहराब हांडा हा अशा प्रकारचा माणूस आहे, ज्याला प्रत्येकजण सहन करतो. काहीजण घाबरतात आणि अनेकजण गुप्तपणे तिरस्कार करतात. ही भूमिका निभावणे रोमांचक आणि अस्वस्थ करणारे होते. चित्रपट एक महत्त्वाचा प्रश्न विचारतो-केवळ आकर्षण किंवा सामर्थ्याने वेढलेले असल्याने विषाक्तता सक्षम करण्यात आपला सहभाग कितपत असतो? रणवीर शौरी म्हणाला, हा चित्रपट नायक आणि खलनायक यांची व्याख्या स्पष्टपणे दाखवणारा नाही. प्रत्येक पात्रात काहीतरी आहे. पश्चाताप, मत्सर, राग... ही संदिग्धता कथा आकर्षक बनवते. या चित्रपटाने अभिनेता म्हणून, कथासूत्राचा शोध घेण्यासारखे बरेच काही दिले आणि माझा प्रिय मित्र रजत कपूर याचे दिग्दर्शन म्हणजे जणू एक मेजवानी होती. नील भूपालम म्हणाले, ही हत्या केवळ धागा आहे. सर्वांना ठाऊक असलेल्या गतकाळाची अस्वस्थता आणि निराकरण न झालेल्या भावना या चित्रपटात बंदिस्त होतात. आपण आपल्या मित्रांना किती चांगल्याप्रकारे ओळखतो आणि ही खात्री किती लवकर संपुष्टात येते याबद्दल विचार करायला लावणारी कलाकृती आहे. हा केवळ आणखी एक व्होडुनिट (रहस्य कथा) नसून प्रतिभावंत रजत कपूरने सादर केलेली एक चतुर मर्डर मिस्ट्री आहे.'एव्हरीबडी लव्हज् सोहराब हांडा'चे स्ट्रीम १० एप्रिलपासून हिंदी नएए५ वर

# काकांच्या वाढदिवसानिमित्त पुतण्याचा माणुसकी जागर

## माजी आ.केशवदादा आंधळे अभिष्टचिंतन दिन, अँड.मयुरभैय्या आंधळे यांनी दिला आर्थिक मदतीचा हात!

**वडवणी । प्रतिनिधी**

एकेकाळी राज्याच्या राजकारणात काका विरुद्ध पुतण्याचा संघर्ष पहावयास मिळाला होता. परंतु वडवणी येथील आंधळे कुटुंबियातील काका माजी आ. केशवदादा आंधळे हे पुतण्यांसाठी एक मार्गदर्शक जेष्ठ व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्याच वाढदिवसानिमित्त कोणताच गाजावाजा न करता पुतणे रुई गावचे आदर्श सरपंच अँड. मयूरभैय्या आंधळे यांनी माणुसकीचा जागर प्रत्यक्ष अंगी बाळगून गावातील अपघातग्रस्त कुटुंबीयांना आर्थिक मदतीचा हात देत आमदार काकांना दीर्घ आयुष्य लाभावे अशी प्रार्थना केली या उपक्रमाचे वडवणी पंचक्रोशीत कौतुक होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, चौसाळा मतदार संघाचे माजी आमदार तथा ऊसतोड कामगारांचे नेते केशवदादा आंधळे यांचा वाढदिवस ६ एप्रिल रोजी अगदी साधेपणाने आणि उत्साहात हितचिंतकांनी साजरा केला. या वाढदिवसाचे औचित्य साधून पुतणे रुई गावचे आदर्श उच्चभूषित सरपंच अँड. मयूरभैय्या आंधळे यांनी काकांचा



वाढदिवस आगळा-वेगळ्या पद्धतीने साजरा करण्याचा मानस ठेवला. 'पैशाची उधळपट्टी नको' वाढदिवसाचा पैसा हा गरजवंतांच्या मदतीला देण्याचा मानस ठेवला आणि काका माजी आमदार केशवदादा आंधळे यांच्या वाढदिवसानिमित्तचे औचित्य साधून मागील मार्च महिन्यामध्ये रुई (पिंपळा) या गावातील अप्पर कुंडलिका मध्यम प्रकल्पचच्या काठावर मोटर चालू करण्यासाठी गेलेल्या गावातील तरुण स्व. पांडुरंग जालिंदर लोंढे या २८ वर्षीय तरुणचा पाय घसरून पडल्याने पाण्यामध्ये बुडून मृत्यू झाला होता. त्या अनुषंगाने सदरील कुटुंबासाठी काही तरी करूयात हा मनाचा संकल्प होता. त्या अनुषंगाने गावचे आदर्श सरपंच अँड. मयूरभैय्या आंधळे यांनी या कुटुंबाला आर्थिक मदतीचा हात देऊन माणुसकीचा जागर निभवला. ही मदत कुटुंबीयांसाठी 'फुल नाही फुलाची पाकळी' बनत कामी आली. तर या कुटुंबीयांसाठी मंत्रालयातून मदत मिळवण्यासाठी कार्यतत्पर राहून मदत मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सुद्धा सरपंच अँड. मयूरभैय्या आंधळे यांनी ग्वाही दिली असून माणुसकीचा आर्थिक हात पुढे करत काकांना दीर्घ आयुष्य लाभावे. अशी प्रार्थना करत माजी आमदार केशवदादा आंधळे यांचा अभिष्टचिंतन दिन अगदी साधेपणाने साजरा करत पुतणे अँड. मयूरभैय्या आंधळे यांनी समाजा समोर आदर्श ठेवला आहे. या सामाजिक उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. यावेळी समवेत ग्रामपंचायत चे विद्यमान उपसरपंच मा. श्री. सुधाकर आप्पा लोंढे पाटील, ग्रामपंचायत सदस्य मा. श्री. कृष्णा नाना खाडे, ग्रा.प. सदस्य मा. श्री. अशोक विष्णू लोंढे, ग्रा.प. सदस्य ना. श्री. बाबासाहेब धर्मराज आंधळे, ग्रा. प. सदस्य मा. श्री. अशोक महादेव लोंढे, सेवा सोसायटी सचिव मा. श्री. बालासाहेब सोपान आंधळे, ज्येष्ठ व्यापारी मा. श्री. गोरख तात्या आंधळे, मा. श्री. कृष्णा आंधळे पाटील, मा. श्री. भागवत लोंढे, श्री. उमेश आंधळे, श्री. कृष्णा महादेव आंधळे, लोकपत्रकार श्री. बाप्पासाहेब भांगे हे उपस्थित होते.

# महानगर गॅस लिमिटेड,कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या सहयोगाने, कल्याणमध्ये पीएनजी नोंदणी शिबिरचे आयोजन

**कल्याण । प्रतिनिधी**

महानगर गॅस लिमिटेड (MGL), भारतामधील एक मोठी शहर वायू वितरण (CGD) कंपनी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सहयोगाने (KDMC), कल्याणमध्ये पीएनजी (पाइप्ड नॅचरल गॅस) नोंदणी शिबिर आयोजित करणार आहे, जो स्वच्छ आणि सोयीस्कर अशा स्वयंपाकाच्या इंधनाच्या स्वीकाराचा प्रचार करणारा एक संयुक्त उपक्रम आहे. हे शिबिर रामबाग ज्येष्ठ नागरिक संस्थान, कल्याण येथे रविवार १२ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आले आहे. जास्तीत जास्त लोकांना या शिबिराचा लाभ घेता यावा, यासाठी हे शिबिर दोन सोयीच्या वेळांमध्ये आयोजित होईल - सकाळी ९ ते दुपारी १ आणि संध्याकाळी ५ ते रात्री ९ रहिवासी या वेळांमध्ये येऊन सहज त्यांची नोंदणी करून घेऊ शकतात.या पीएनजी नोंदणी शिबिराचा उद्देश, केंद्र सरकारच्या अलीकडील आदेशाचे पालन करून रहिवाशांना तत्काळ साहाय्य आणि मार्गदर्शन पुरवून त्यांच्या घरगुती पीएनजी जोडण्यांची नोंदणी प्रक्रिया सुलभ करणे हा आहे. या शिबिरात, रहिवाशांना पीएनजीचे फायदे समजून घेता येतील, कागदपत्रांसंबंधी मार्गदर्शन मिळेल आणि शिबिराच्या ठिकाणी असलेल्या प्रशिक्षित एमजीएल कर्मचाऱ्यांच्या मदतीने ते आपली नोंदणी प्रक्रिया सहजपणे पूर्ण करू शकतील.महानगर गॅस लिमिटेड कल्याण आणि आसपासच्या परिसरातील रहिवाशांना या शिबिरात सहभागी होऊन आपल्या घरांसाठी सुरक्षित, विश्वासार्ह आणि हरित इंधनाचा अवलंब करण्याच्या दिशेने एक पाऊल उचलण्यासाठी आमंत्रित करत आहे. पीएनजी (झछॠ) एक आधुनिक उपाय सादर करते, जो पारंपरिक इंधनावरील अवलंबित्व कमी करतो आणि अधिक हरित व निरोगी भविष्याच्या संकल्पनेशी सुसंगत आहे.

# ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात काटई-ऐरोली रस्ता प्रकल्पातील बाधितांसोबत बैठक पार

**संतोष पडवळ । ठाणे**

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात काटई-ऐरोली रस्ता प्रकल्पातील बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांसोबत बैठक पार पडली. सदरची बैठक आमदार राजेश मोरे यांच्या प्रयत्नाने ठाणे जिल्हाधिकाऱ्यांसोबत आयोजित करण्यात आली होती. या बैठकी मध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले कि येणाऱ्या आठवड्यामध्ये ठाणे महानगरपालिका अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून त्यांना निवेदन पत्र देण्यात येईल व बाधित शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला देण्यात येईल.

सदर बैठकीत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य व न्याय्य मोबदला देण्यात येईल, यावर अधिकृतपणे शिक्कामोर्तब करण्यात आले. हा निर्णय शेतकऱ्यांसाठी दिलासा दायक ठरणार आहे. प्रसंगी कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे,




नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चना निलेश पाटील, नगरसेवक गजानन पाटील साहेब , मधुकर पाटील, सुनील पवार, पंढरी पाटील, राकेश भोईर, राम पाटील, अनंता म्हात्रे, किशोर म्हात्रे, सावन ठाकूर, निखिल देवकर व सदर प्रकल्प बाधित अनेक शेतकरी उपस्थित होते.

# कळंबोली मधील रस्त्यावर टाकण्यात आलेली खडी नागरिकांसाठी जीव घेणारी

**पनवेल । प्रतिनिधी**

कळंबोली मध्ये रस्त्याची कामे सुरू असून ती कामे करताना खडी वापरली जाते. ती खडी रस्त्यावर पसरल्यामुळे दुचाकी घसरणे, वाहनांचे नुकसान आणि अपघात होऊन काहीना अवयव गमवावे लागत आहेत. तेव्हा ही खडी रस्त्यावरून काढण्यात यावी अशी मागणी कळंबोली नागरिकांकडून केली जात आहे.

कळंबोली शहरातील मुख्य रस्ता हा सिमेंट काँक्रीटचा बनविण्यात आला आहे. पण हा रस्त्या एवढा निकृष्ट दर्जाचा बनविण्यात आला आहे की त्या रस्त्यावर एक महिन्यातच खड्डे पडले आहेत. आता या रस्त्याची कामे अंतिम टप्प्यात आले असून रस्त्याचे विभाजकाची कामे चालू आहे. त्यासाठी लागणारी खडी आणि वाळू ठिकठिकाणी टाकण्यात आली आहे. सिडको कार्यालयाजवळील रस्त्यावर टाकण्यात आलेली खडी आणि वाळू नागरिकांचा जीव घेणारी ठरत आहे.. त्याच प्रमाणे रस्त्यावर पडलेली खडी हा प्रामुख्याने खराब रस्ते, अपूर्ण कामे किंवा डागडुजीतील निष्काळजीपणामुळे निर्माण झालेला धोकादायक प्रकार आहे. यामुळे दुचाकी घसरणे, वाहनांचे नुकसान आणि अपघातांचे



प्रमाण वाढते आहे. यात काहीना आपले अवयव गमवावे लागत आहेत. कळंबोली मधील रस्ते बनविताना सिमेंटचा वापर कमी आणि खडीचा वापर जास्त केल्याने ती एक महिन्यातच मोकळी होऊन बाहेर आली आहे. खड्डे पडले आहेत. चुकीच्या पद्धतीने रस्ते दुरुस्ती किंवा निकृष्ट काँक्रीटमुळे ही खडी बाहेर आली आहे ज्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. तेव्हा रस्त्यावर आलेले खडी वाळू ताबडतोब काढण्यात यावी अशी मागणी कळंबोली जनतेतून जोर धरत आहे.

# संगमेश्वर मधे माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांचा ७५ वा वाढदिवसउत्साहात साजरा




**संगमेश्वर । सत्यवान विचारे**

विद्यमान केंद्रीय मंत्री आणि माजी मुख्यमंत्री मा. नारायणराव राणे साहेब यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी संगमेश्वर उत्तर मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला..यावेळी श्री अमायनेश्वर मंदिर, बुरंबाड येथे अभिषेक व पूजा करून राणे साहेबांना दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्य लाभावे, अशी प्रार्थना करण्यात आली. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, माखजन येथील रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.माखजन पंचक्रोशीतील निराधार व विधवा महिलांना साडी वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली गेली.

या कार्यक्रमास तालुकाध्यक्ष विनोद मस्के, तालुका सरचिटणीस डॉ. अमित ताठरे, प्रशांत रानडे, पंचायत समिती सदस्य महेश जडचार, जिल्हा कार्यकारिणी सदस्य सुभाष भाई नलावडे, चंद्रकांत जाधव, गोमाता संरक्षण समितीचे जिल्हा संयोजक अविनाश गुरव, महिला तालुकाध्यक्ष सौ. शितल दिंडे, कडवईचे माजी उपसरपंच संतोष जाधव, भास्कर मांडरकर, पाचांबे सरपंच संदेश घाडगे, संजय भायजे, तांबेडीचे माजी सरपंच राजू ब्रीद, गणेश साठे, अतिश चव्हाण, रोशन पाष्टे, शांताराम सुर्वे, प्रथमेश शिंदे, सौ. वैष्णवी चव्हाण, श्रीम. ऊर्मिला कातकर, प्रथमेश कडवईकर आदी उपस्थित होते.हा कार्यक्रम जिल्हाध्यक्ष प्रशांत यादव यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संगमेश्वर उत्तर मंडळ अध्यक्ष विनोद म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

# पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; समाजोपयोगी उपक्रमातून मानवतेचा संदेश

**पनवेल । प्रतिनिधी**

पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती व नेरूळ येथील तेरणा ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन बाजार समितीच्या कार्यालयात करण्यात आले. समाजोपयोगी भावनेतून आयोजित या उपक्रमाला समितीचे कर्मचारी, व्यापारी, शेतकरी तसेच माथाडी कामगारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले.

‘रक्तदान हे जीवनदान’ या भावनेतून विविध घटकांनी पुढाकार घेत सहभाग नोंदविला. शिबिरात अनेकांनी प्रथमच रक्तदान करून सामाजिक बांधिलकीची जाणीव व्यक्त केली. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेवर मदत व्हावी तसेच समाजात रक्तदानाबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला होता.



या कार्यक्रमास नारायणशेठ घरत (सभापती) यांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजन केले जाते असे मत व्यक्त केले. तसेच सुनील सोणावळे (उपसभापती) यांनीही उपस्थिती दर्शवली

ब्लड बँकेला रक्तपुरवठा तुटवडा भासू नये म्हणून त्यांनी केलेला सूचने नुसार संचालक देवेंद्र पाटील यांनी बाजार समितीकडे रक्तदान शिबिर घेण्याबाबत सूचना केली, संचालक दिनेश महाडिक यांच्या पुढाकारात व संचालक मंडळाच्या सहयोगाने रक्तदान शिबिर सहमती दर्शवण्यात आली होती त्या अनुषंगाने रक्तदान शिबिर आयोजन यशस्वी संपन्न झाले. यामध्ये नारायण गोमाजी घरत (सभापती), सुनिल दुकल्या सोणावळे (उपसभापती), तसेच प्रकाश नाईक (सचिव), सुभाष हरिभाऊ पाटील, अशोक गणू गायकर, बाळकृष्ण नारायण पाटील, प्रताप चंद्रकांत हातमोडे, रामचंद्र आत्माराम पाटील, सखाराम गंगाराम पाटील, अर्जुन पांडुरंग गायकर, सौ.ललिता गोपीनाथ फडके, महादू गोपाळ पाटील,देवेंद्र गंगाराम मढवी, देवेंद्र अनंत पाटील,मच्छिंद्रनाथ गणा पाटील, दिनेश ज्ञानेश्वर महाडीक, सोमनाथ जनार्दन म्हात्रे, अतिश दत्ता पाटील यांचे पाठबळ लाभले शिबिरात सहभागी झालेल्या कर्मचारी, व्यापारी, शेतकरी व माथाडी कामगारांसह रक्तदात्यांमध्ये माजी संचालक रमाकांत गरुडे,संचालक दिनेश महाडिक,संचालकदेवा पाटील यांनी व बाजार समिती मधील व्यापारी वर्गाने स्वयंस्फूर्तीने मोठ्या उत्साहात रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला. आयोजकांच्या वतीने सर्व रक्तदात्यांचे आभार मानण्यात आले. या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले असून भविष्यातही अशा समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.



**बीड शहर पोलीस दलाच्या वतीने आयोजित मोफत आरोग्य तपासणी उपचार शिबिरात अखिल भारतीय पत्रकार सुरक्षा समितीचे बीड जिल्हाध्यक्ष पठाण अमरजान यांचे स्वागत करताना पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ छायाचित्र दिसत आहे.**

## मुंबई भाजप महिला मोर्चा उपाध्यक्षपदी ॲड.ज्योती दुराफे

**मुंबई । प्रतिनिधी**

विक्रोळी कन्नमवार नगरातील युवा कार्यकर्त्या व ज्यांचे भाषणावर प्रभुत्व असलेल्या ड. ज्योती दुराफे बुचके यांची भाजपा मुंबई महिला मोर्चाच्या उपाध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली आहे.मुबई भाजपा महिला मोर्चाच्या



अध्यक्षा योजनाताई ठोकळ यांच्यासह सामाजिक, राजकीय, शैक्षणिक संस्थानी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.ड ज्योती दुराफे या भाजप नेत्या व पुणे जिल्हा परिषदेच्या माजी विरोधी पक्ष नेत्या आशाताई बुचके यांच्या कन्या आहेत.




**ठाणे : दिवा रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वारासमोर कचऱ्याचा डोंगर निर्माण झाला असून प्रशासनाचे पूर्णतःहा दुर्लक्ष दिसून येत आहे. कोकण रेल्वेसह पश्चिम रेल्वे मार्गाला जोडणारे दिवा जंक्शन कचऱ्यात हरवू लागले असल्याचे निदर्शनास येऊ लागल्याने वाढत्या लोकसंख्येच्या दिवा शहरातील जीवघेणा प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांना आता प्रचंड दुर्गंधीतून वाट काढून दिवा रेल्वे स्थानकात जावे लागत आहे. ( फोटो – संतोष पडवळ )**

# गुड आयडिया फिल्म्सतर्फे राम गोपाल वर्मा यांचा वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा

**मुंबई । प्रतिनिधी**

चित्रपटसृष्टीतील दिग्गजांच्या उपस्थितीत चित्रपटसृष्टीच्या नव्या पर्वाची सुरुवात दिग्गज आणि प्रतिष्ठित भारतीय चित्रपट निर्माते राम गोपाल वर्मा यांच्या वाढदिवसानिमित्त, गुड आयडिया फिल्म्सतर्फे कीनो कॉटेज येथे एका भव्य आणि ग्लॅमरस सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याचे सूत्रसंचालन प्रदीप खैरवार (संस्थापक, दिग्दर्शक आणि निर्माता – गुड आयडिया फिल्म्स) आणि शेफाली सिंग राजपूत (व्यवस्थापकीय संचालक आणि निर्माता – गुड आयडिया फिल्म्स) यांनी केले, ज्यात भारतीय चित्रपटसृष्टीतील काही अत्यंत प्रमुख नावांना एका छताखाली एकत्र आणण्यात आले. या सोहळ्यात मनोज बाजपेयी, रितेश देशमुख, जेनेलिया देशमुख, भरत दाभोळकर, राजपाल यादव, सुनील शेट्टी, सौरभ शुक्ला, अप्सरा राणी, ताहा शाह बदुशा, ईशा कोप्पिकर, मुश्ताक शेख आणि आर्या बब्बर यांसारखे दिग्गज कलाकार उपस्थित होते. मधुर भांडारकर, निखिल द्विवेदी, अंशुल गर्ग आणि लेखक मुश्ताक शेख यांसारखे नावाजलेले चित्रपट निर्माते आणि प्रसिद्ध कास्टिंग डायरेक्टर व चित्रपट निर्माते मुकेश छाबरा यांच्या उपस्थितीने या कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. ही संध्याकाळ केवळ एक वाढदिवसाचा सोहळा नव्हती, तर विकसित होत असलेल्या सिनेमाचे आणि सर्जनशील सहयोगाचे प्रतिबिंब होते, ज्यात कथाकथनाचे भविष्य आणि चित्रपट निर्मितीतील नवनिर्मिती यावर चर्चा झाली. चित्रपटांच्या कथानकांना नवी दिशा देण्यासाठी ओळखले जाणारे राम गोपाल वर्मा यांनी या प्रसंगी आपले विचार व्यक्त केले, ते म्हणाले, मी सहसा वाढदिवस साजरा करत नाही, पण ही एक नवीन गोष्ट आहे. मला काहीतरी वेगळं करावंसं वाटलं. हे सिनेमाचं एक नवीन पर्व आहे आणि मला




विश्वास आहे की, त्यासोबत मीसुद्धा पूर्णपणे बदललो आहे. आयोजक प्रदीप खैरवार (संस्थापक, दिग्दर्शक आणि निर्माता – गुड आयडिया फिल्म्स) आणि शेफाली सिंग राजपूत (व्यवस्थापकीय संचालक आणि निर्माता – गुड आयडिया फिल्म्स) यांनी एका संयुक्त निवेदनात, या सोहळ्यामागील आपली दूरदृष्टी व्यक्त केली: राम गोपाल वर्मा यांचा वाढदिवस साजरा करणे म्हणजे केवळ एक वाढदिवस साजरा करणे नाही, तर अशा एका चित्रपट निर्मात्याचा सन्मान करणे आहे, ज्यांनी सातत्याने रूढींना आव्हान दिले आहे आणि भारतीय सिनेमाला नवी दिशा दिली आहे. ही संध्याकाळ नव्या युगातील कथाकथनाची भावना आणि आम्ही ज्या बदलत्या सर्जनशील परिदृश्यावर विश्वास ठेवतो, त्याचे प्रतिबिंब आहे. आधुनिक चित्रपटनिर्मितीच्या बदलत्या गतिशीलतेचा स्वीकार करत, अर्थपूर्ण उद्योग-संबंध जोपासण्याच्या आणि चित्रपट क्षेत्रातील उत्कृष्टतेचा गौरव करण्याच्या ‘गुड आयडिया फिल्म्स’च्या वचनबद्धतेचा हा कार्यक्रम एक पुरावा होता.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को–ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५ गोरख रामदास सुर्यवंशी (कार्यकारी संपादक)